पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक ०८.१०.२०१८

# वार्तापत्र

## नक्षलवादयांनी घातपाताच्या दृष्टीने पेरून ठेवलेला भुसुरूंग पोलीस दलाने केला निकामी

नक्षलवादयांनी उपविभाग पेंढरी अंतर्गत येणाऱ्या पोमकें गट्टा (फु.) हद्दीत गट्टा (फु.) ते पेंढरी रोडवरील जप्पी फाटयानजिक घातपाताचे उद्देशाने भुसुरूंग पेरून ठेवला आहे अशी गोपनिय माहिती दिनांक ०७/१०/२०१८ रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक मा. श्री शैलेश बलकवडे सो. यांना मिळाली.

सदर माहिती प्राप्त होताच मा. पोलीस अधीक्षक श्री शैलेश बलकवडे सो. यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी पेंढरी डॉ. बसवराज शिवपुजे, सपोनि संदिप मंडलिक, गडचिरोली बिडीडीएस चे प्रभारी अधिकारी श्री प्रदिप ठुबे यांच्या नेतृत्वाखाली बॉम्ब शोधक पथक, पोमकें गट्टा (फु.) येथील प्रभारी अधिकारी पोउपनि प्रमोद खरात व पोलीस कर्मचारी, सी-६० कमांडोचे पथक, पोलीस नाईक विलास पवार, सिआरपीएफ १९२ बटालीयनचे अधिकारी व कर्मचारी यांना तात्काळ घटनास्थळी रवाना करण्यात आले. सदर टीमने अतिशय कौशल्यपुर्ण व शिस्तबध्द अभियान राबवुन नक्षलवादयांनी पेरून ठेवलेला भुसूरूंग निकामी करण्यात यश प्राप्त केले.

सदर भुसूरूंग निकामी करण्यात आल्याने नक्षलवादयांनी मोठा घातपात घडवुन आणण्याचे उद्देशाने केलेले प्रयत्न मोडीत काढून मोठी जिवीत हानी टाळण्यात गडचिरोली पोलीस दलास यश मिळाले आहे. नक्षलविरोधी मोहिमेचे हे मोठे यश मानले जात आहे.